पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ८ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजला टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी विजेतपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने संजीवन स्कूल हॉल रंकाळा, येथे घेण्यात आलेल्या महानगरपालिकास्तर टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतपद मिळविले. विजेतपद मिळविताना मुलांनी अंतिम सामन्यात न्यू हायस्कूल संघाचा २-० ने तर मुलींनी डी. वाय. पाटील कॉलेजचा २-० ने पराभव केला.



संघातील खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन तर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.